महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३५ वा | दिनांक : १३/०७/२०२५ | वार : रविवार

## संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस : मंत्री संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस बजावण्याचा इशारा दिला आहे. गत काही दिवसांपासून संजय राऊत मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी माझी माफी मागितली नाही, तर मी त्यांना मानहाणीची नोटीस बजावेल. तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल करेन, असे ते म्हणालेत. संजय राऊत यांनी स्वप्ना पाटकर यांच्याविषयी काय - काय बोलले होते, त्याचा व्हिडिओ पाहिला, तर आपल्याला त्यांची लायकी कळेल, असेही ते यावेळी म्हणाले.

मंत्री संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, संजय राऊत यांनी जर माफी मागितली नाही तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. ते राज्यघटना मानत नाहीत. ते पुन्हा सांगतील अशा अनेक नोटीस आम्ही खिशात घेऊन फिरतो. परंतु कायद्याच्या चौकटीत बसून मी आज नोटीस पाठवणार आहे.याचे उत्तर दिले नाही तर फौजदारी गुन्हा देखील दाखल करेल.

संजय शिरसाट म्हणाले की, संजय राऊत रोज सकाळी लोकांच्या शिव्या खातात.म्हणून त्यांना मान अपमान काही कळत नाही.कोणत्या गोष्टीवर बोलावे याचे त्यांना भान नाही. त्यांचे जे विद्वान सहकारी आहे एक महिन्याचे विद्वान असेच आरोप करत राहणार. हे सगळे दलालांची एक गँग महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहे.याचे सर्व पुरावे माझ्याकडे आहे, पण खालच्या राजकारणाकडे मला जायचे नाही. परंतु आता मला असा वाटायला लागले आहे की आता त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याची गरज आहे, असे म्हणत त्यांनी अंबादास दानवेंवर टीका केला आहे. हे सर्व रुदाली पक्षाचे रडके लोक आहेत. अभ्यास न करता बोलणाऱ्याच्या बुद्धीचा कीव येते.

संजय शिरसाट म्हणाले की, कोणी कुठे कुठे सरकारी बंगल्यात पार्ट्या केल्या आहेत त्याचे व्हिडिओ मला पुढे आणावे लागतील. पुणे, मुंबई असे सर्व प्रकार जेव्हा मी बाहेर काढेल त्यांना पळता भोई थोडी होईल. पण मला या नीच पातळीवर जाण्याची आज तरी इच्छा नाही. जर माझ्या विरोधात गरळ ओकण्याचा प्रयत्न केला तर मलाही तसे उत्तर द्यावे लागेल.

संजय शिरसाट म्हणाले की, सुसंस्कृत असलेले तुम्ही अशी नीच पातळीवर गाठली का? असे राजकारण महाराष्ट्राने आजपर्यंत पाहिले नाही. अशा व्हिडिओतून आमची बदनामी होते असे तुम्हाला वाटते. मला टार्गेट करण्याचा प्रयत्न आहे हे यातून दिसून येते. जयंत पाटील हे गेली अनेक दिवस मनातून पक्षासाठी काम करताना दिसून येत नव्हते. त्यांनी मागेच सांगितले होते की मी राजीनामा देणार. त्यातून त्यांनी आज राजीनामा दिला असेल. ते आमच्यासोबत येतील याचा निर्णय कधी घेता त्यांना विचारा.

संजय शिरसाट म्हणाले की, ईडी, आयकर विभाग आपले काम करत असतात त्यांनी नोटीस पाठवली याची चर्चा करण्यापेक्षा तुम्ही त्यांचे उत्तर द्या, ते आपले काम आहे. आपण जर काही चूक केलीच नाही तर आपण घाबरण्याची गरज नाही असे त्यांनी रोहित पवारांच्या प्रश्नावर बोलताना म्हटले आहे. आपल्यावर संकट आल्याचे समजण्याचे काही कारण नाही. चूक असेल तर कारवाई होणारच, असेही त्यांनी बोलताना म्हटले आहे.

## महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एका मुंढेंची एन्ट्री



**मुंबई :** भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या तिसऱ्या कन्या यशश्री मुंडे या राजकीय मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. परळी येथील वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून. यामुळे त्यांच्या राजकीय पदार्पणाची जोरदार चर्चा सुरू आहे.

वैद्यनाथ बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी यशश्री यांच्यासह त्यांच्या भगिनी पंकजा मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि इतरांनी मिळून ७१ अर्ज दाखल केले आहेत. यापूर्वी वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी एकत्र येऊन बिनविरोध यश मिळवले होते. यंदाही दोघे एकत्र दिसण्याची शक्यता आहे.

यशश्री मुंडे या स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या तिसरी कन्या असून पेशाने वकील आहेत. त्यांनी अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातून एल. एल. एम ही पदव्युत्तर पदवी घेतली आहे. त्यांना कॉर्नेल विद्यापीठाकडून, "प्रॉमिसिंग आशियाई विद्यार्थी" म्हणून गौरवण्यात आले होते. पंकजा आणि प्रीतम यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले, तर यशश्री यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले. इतकी वर्षे त्या राजकारणापासून काहीशा दूर होत्या. मात्र आता वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीसाठी अर्ज भरला आहे.

वैद्यनाथ बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. १० ऑगस्टला मतदान तर १२ रोजी मतमोजणी होणार आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी माजी खासदार डॉक्टर प्रीतम मुंडे यशस्वी मुंडे या भगिनींसह ७१ अर्ज दाखल झाले. सर्वसाधारण मतदारसंघातील १२ जागांसाठी ५२ अर्ज दाखल झाले आहेत. अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी ४ अर्ज, भटक्या विमुक्त जाती-जमाती (विमाप्र) च्या एका जागेसाठी ४ अर्ज, इतर मागासवर्गीय (ओबीसी) साठी एका जागेसाठी ६ अर्ज, आणि महिलांसाठी राखीव दोन जागांसाठी ५ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे निवडणुकीत चुरस वाढण्याची शक्यता आहे. वैद्यनाथ बँकेचे संचालक मंडळ यंदा बिनविरोध निवडले जाणार की निवडणूक होणार, याबाबत उत्सुकता आहे. २९ जुलै दरम्यान अर्ज मागे घेण्याचा कालावधी असून यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, गोपीनाथ मुंडे यांचे नाव राज्यातच नाही तर देशातल्या राजकारणात नावाजलेले आहे. त्यांचा राजकीय वसा घेत पंकजा मुंडे आणि प्रीतम मुंडेंनी राजकारणात स्वत:ला सिद्ध केले. पंकजा मुंडे दोन वेळा विधानसभेवर निवडून आल्या आहेत. तर आता त्या विधान परिषदेच्या आमदार आणि राज्याच्या मंत्री आहेत. तर, प्रीतम मुंडे या दोन वेळा बीड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार राहिलेल्या आहेत. आता गोपिनाथ मुंडे यांची तिसरी कन्या यशश्री यांनी वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच अर्ज दाखल केला आहे.

## भाजपचा शोषितांचा आवाज दाबण्यासाठी प्रयत्न, संजय राऊतांचा आरोप



**मुंबई :** जनसुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आम्ही त्याला विरोध करत राहू. दलित, शोषित पीडित यांचा आवाज उठवणाऱ्या संघटना, त्यांना समर्थन देणारे सामाजिक कार्यकर्ते त्यांना व्यसन घालून कारागृहात पाठवण्यासाठी हे जन सुरक्षा विधेयक आणले आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, जिथे फडणवीसांचे सरकार पोहचत नाही संघ पोहचत नाही तिथे संघटना पोहचतात ही यांची खरी पोटदुखी आहे. राज्यात जवळपास अशा ७० च्या आसपास संघटना कार्यरत आहे. त्यांच्यावर शहरी नक्षलवादी म्हणून कार्यवाही करण्यासाठी हा कायदा आणला आहे, असा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, आणीबाणीच्या काळात मिसा कायदा आणला गेला होता. त्यामुळे आणीबाणी बदनाम झाली होती. मिसा कायद्याच्या अंतर्गत ज्यांना अटक करण्यात आली ते लोक गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते. त्यानंतर ताडा आला, त्यात छोट्या-छोट्या गुन्ह्यांमध्ये ताडा लावत राजकीय पदाधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्यात आले. आता जन सुरक्षा कायदा आणला. तुमचे सरकार आज आहे उद्या नाही. जनतेच्या सुरक्षेचा ठेका तुम्ही घेतलेला नाही. जन सुरक्षेमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांवर अशा प्रकारे बंदी आणणे असा होत नाही. अनेक सामाजिक संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, बहुमताच्या जोरावर तुम्ही कायदा मुजूर केला असला तरी विरोधी पक्षातील आम्ही सर्व या कायद्याला विरोध करु. उद्धव ठाकरे यांनी काल स्पष्ट केले आहे की हा जन सुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आजही आदिवासी पाड्यांवर रुग्णालय नाहीत. गरोदर महिलांना झोळीतून रुग्णालयात नेतांना त्यांचे मृत्यू झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या विदर्भातील आणि एकनाथ शिंदेंच्या ठाण्यातील चित्र अतिशय खराब आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ जुलै २०२५


# श्री माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीत विद्यार्थ्यांचा गौरव




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुंबई महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या घेण्यात आलेल्या उन्हाळी 2025 परीक्षा निकाल नुकताच जाहीरकरण्यात आला असून श्री माधवराव पाटील कॉलेजऑफ फार्मसीत औषध निर्माणशास्त्र पदविका डी फॉर्मसी मध्ये घवघवीत यश संपादन केले आहेश्री माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचा द्वितीय वर्षात प्रथम..अंकित सुरतबन्सी ..८२% द्वितीय... राजमाने ओमकार..७९.८२% तृतीय... श्रीशा मुरुमकर.. ७८.५% आले आसुनडि फॉर्म प्रथम वर्षामध्ये प्रथम..कारभारी मुस्कान.. ७८.७३%द्वितीय... साक्षी पाटील..७८.५% तृतीय... धुमाळ अस्मिता ७३.४०% यांनी यश संपादन केलेया प्रसंगी संस्थेचे संचालक तथा उमरगा सहकारी बँकेचे चेअरमन शरणजी पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार, भेटवस्तु देउन सत्कार करण्यात आला. कायम दर्जेदार शिक्षण देण्याची गुणवत्ता जोपासत यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी चांगले गुण प्राप्त केल्यामुळे विठ्ठल साई कारखान्याचे अध्यक्ष बसवराज पाटील, संस्था अध्यक्ष बापुराव पाटील, श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. किरणसिंग राजपुत, पदार्थ विज्ञानचे डॉ. रवी आळंगे श्री सुदीप ढंगे, प्रा विवेकानंद चौधरी प्रा.पायल अंबर, प्रा पाटील वैष्णवी, प्रा. विनीत बसवंत बागडे, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. लिमये राजनदिंनी ,प्रा मुजावर मॅडम, किशोर कारभारी, कटकेयांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लोकशाहीचे स्तंभ



कुणाचे काहीही होवो
मी चांगला राहिलो पाहिजे
कुणी वाचो अथवा मरो
स्वार्थाला तडा गेला नाही पाहिजे

नेते आणि कार्यकर्त्यांचीही
समाजसेवेशी बांधिलकी राहिली नाही
फक्त पद,प्रतिष्ठा आणि पैसा
त्यांना जनतेचे काही देणेघेणे नाही

जनताही दीडशहाणी त्यांच्यासारखी
कार्याला अन् ख-याला किंमत देत नाही
इलेक्शन मधील पैशामुळे
त्यांनाही काडीचा भाव राहत नाही

शिकलेलीही सारे
मतलबासाठी लाचार झाले
राष्ट्रीयत्वाची भावना जोपासण्याऐवजी
जातीय, धर्मीयतेने वागू लागले

षंढ झालीत सारी माणसे
कुणी सत्यासाठी बोलतही नाही
दिवसाढवळ्या लोकशाहीचे धिंडवडे
उघड्या डोळ्याने पहावत नाहीत

भारताचे भवितव्य काय?
मनात प्रश्न चालू लागले
लोकशाहीचे चारही स्तंभ
भारताचा विध्वंस करू लागले

**प्रा. डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर (धुळे)**
मो. +91 75075 04046




# अहिराणी भाषेचे अभ्यासक डॉ. सुधीर देवरे यांना जीवन गौरव पुरस्कार



**नाशिक :** भाषातज्ज्ञ, अहिराणी भाषेचे गाढे संशोधक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुधीर राजाराम देवरे यांना 'खानदेश विकास मंडळ व जागतिक अहिराणी संवर्धन परिषद' यांच्या वतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. रविवार, २७ जुलै २०२५ रोजी नाशिक येथे मान्यवरांच्या हस्ते डॉ. सुधीर देवरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्ताने: भाषा', 'सोन्यानी शाळा', 'सायकोना तिढा', 'भाषा : व्याप्ती आणि गंड', 'अहिराणी : भाषा, परंपरा आणि लोकसंस्कृती', 'गावदवंडी', 'डोंगरदेव', आदी अहिराणी भाषा, भाषा व लोकसंस्कृती विषयक डॉ. देवरे यांची ग्रंथसंपदा प्रकाशित आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ जुलै २०२५


# सामाजिक सावधान



१.एकजूट नसल्यामुळेब्राह्मणी सरकार जनसुरक्षा कायदानव्हे तर सत्ताधारीविरोधात आवाज ना उठे याकरिताब्राह्मणी सुरक्षा कायदा मंजूर करतेय. २.तुम्ही स्व:ताला आंबेडकरी अनुयायी समजणारे पण संघटित, संघं सरणंगच्छामी.न मानणारे.तुकडे तुकडेराजकीय पक्ष, विविध संघटनांना प्रसिद्धी देताय, ३. तसेच बेकीसाठी भिन्न भिन्न संघटना,पक्षांचे वर्धापन दिनसोहळे साजरे करण्यास साथ सहयोग करताय. ४.तुमच्या समाजाच्या भावनेचा विचार करणारा, त्यांच्या प्रगतीसाठी झटणारा. कुणीच नेतानाही दिसतोय. ५.तुम्हीच राजकीय पक्षाचे, संघटनेचे लोकया प्रकारे वागून, शत्रूच्या हाती आयतेकोलीत सोपवताय.

६.तुम लोग बिखरेंगे, तो कटेंगे, बिखरनेसें,ते लोक राजकीय लाभ उठवताय.

७.आंबेडकरी नेते, पुढारी लोकांत, भरपूर स्वाभिमान, गर्व अहंपणा, मोठेपणा, मीपणाठासून भरलाय.

८.जे जे नेते,पुढारी आणि त्यांचे पक्षीय पदाधिकारी असे, तेलोकांसाठी एकपाऊल मागेघेत नाय.

९.नेतेगिरी संपेल या भीतीपोटी नेते, पुढारी वतयांचे चमचे, चेले चपाटे, तडजोड, गठबंधन, युती, आघाडी करण्यापासून दूर पळताय.

१०.सर्वच नेत्यांच्या, पुढाऱ्यांच्या, विभागप्रमुख, तालुका प्रमुख, जिल्हा प्रमुखपदात खुश राहणाऱ्या पदे धारकांनीआंबेडकरी भावनेचा फायदा उचलून, आप आपली दुकानं थाटलीय.

११.सर्वात महत्वाचे आता तर उद्योग, धंदा, आर्थिक उन्नतीच्या नावाखाली संस्था, पतसंस्थेसाठी पैसे उकळण्याचे काम सुरू झालेय.

१२.सामाजिक काम, समजून समाज बांधव,भगिनी यासाठी तुमचेच भावनिक लोक, नेत्यांच्या आयरे-गयरे,नथु-खयरे यांच्यावर विश्वास ठेऊन सभासदत्व घेताय.

१३.भूपती सांगतोय अनुभवी बोलशेवटचे अतिशय महत्त्वाचे म्हणजे हिशेब, जमाखर्च, ताळेबंद पत्रक, ऑडिट रिपोर्ट देताना पळवाट काढताय.

**कवी, लेखक**
**भूपती अ.मोरे,ठाणे**
**९५९४३८६२७७.**

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयातील सामाजिक शास्त्रे व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ जुलै २०२५ रोजी ११:०० वा."मोफत स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्स"चे उद्घाटन डॉ. हेमंत सोनकांबळे व प्राचार्य डॉ. सुनीता बाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.हेमंत सोनकांबळे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई या होत्या. आय. कयु .ए. सी. कॉर्डिनेटर डॉ. पराग चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. शोभा हनवते व समाजशास्त्र विभागातील प्राध्यापिका डॉ. आरती धनवे या व्यासपीठावर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे डॉ. हेमंत सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी हे सांगताना, विविध क्षेत्रातील थोर महापुरुषांचे चरित्र वाचावे असे सांगितले . मराठवाड्यात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या अनेक महापुरुषांची उदाहरणे दिली. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी सुरवातीस आपली भाषा निवड करावी व आपली परीक्षेची तयारी करत असताना जिद्दीने व चिकाटीने अभ्यास करावा असे सांगितले.या क्षेत्रामध्ये यश गाठायचे असल्यास शिक्षकाचे मार्गदर्शन शेवटपर्यंत घ्यावे असे आवाहन केले. तसेच या स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अनेक चढउतार येतात तेव्हा घाबरून न जाता मोठ्या यशासाठी प्रयत्न करावा . तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी ही माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवीचे शिक्षण घेत असताना पासून करत असल्यास आपल्याला यशाच्या जवळ जाता येते. असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांना सक्सेस स्टोरीत येण्यासाठी मोबाईल पासून दूर राहण्याचा सला दिला. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरित व्हा, आत्मविश्वास वाढवा, स्वतःला अपडेट ठेवा असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ .सुनिता बाजपाई यांनी सांगितले की जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या मोफत वर्गाचा उपयोग करून जीवनामध्ये यश संपादित करावे असे सांगितले. या कोर्स साठी मेहनत घेणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सविता मनोहर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आरती धनवे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रगटन प्रा. अश्विनी शहाणे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी तसेच इतर महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज एमआयडीसीत थरारक घटना




**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वाळूज एमआयडीसी परिसरात आज (१२ जुलै) सकाळी एक धक्कादायक आणि मन हेलावणारी घटना समोर आली आहे. अंबेलोहळ (गट क्र. ३७) येथे २३ वर्षीय अर्जुन रतन प्रधान या तरुण कामगाराचा अमानुष मारहाण करून खून करण्यात आला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अर्जुन प्रधान हा वाळूज एमआयडीसीतील एका खासगी कंपनीत काम करत होता. कालच त्याचा पगार झाला होता. आज सकाळी अर्जुनचा सावत्र भाऊ रामकृष्ण याला तो रस्त्याच्या कडेला अर्धनग्न अवस्थेत, गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. तातडीने पोलिसांना कळवण्यात आले. वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

मृतदेह पाहताच अर्जुनच्या आईने हंबरडा फोडला. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक तपासात, अर्जुनला कपडे काढून अमानुषपणे मारहाण करण्यात आली असून, यामधूनच त्याचा मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मारहाण कोणत्या कारणातून आणि नेमकी कोणी केली? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, अर्जुनचा कालच पगार झाल्याची माहिती आणि त्याच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी पोलिस करत आहेत.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ जुलै २०२५

# प्रत्येक धर्मात योगा, मानसोपचार आणि हस्तमुद्रा चिकित्सेला महत्त्वाचे स्थान




प्राचीन काळात अगोदर फक्त दोनच जाती होत्या त्या म्हजे स्त्री आणि पुरुष त्या नंतर काही वर्षांनी चार वेद तयार झाले.वेदाचा अभ्यास फक्त ब्राह्मण यांनीच केला. अन्य कुणी केलाही असेल तर त्याचे पुरावे उपलब्ध नाहीत.

या मधून नंतर चार वर्ण अस्तित्वात आले.१)ब्राह्मण २)क्षत्रिय ३) वेश्य ४) शुद्र. हे वीशिष्ट प्रकारचे वर्ण ठरविले ले काम करत होते. एक वर्ण हा दुसऱ्या वर्णा मध्ये जाऊ शकत नव्हता . तो ज्या ठिकाणी जन्मा ला आला त्याने त्याच वर्ण मध्ये राहावे व त्याच वर्णा चे काम करावे, अन्य कोणते काम करू नये. असा अलिखित नियम सर्वांना मान्य पण होता. या मधून मग धर्म ही संकल्पना अस्तित्वात आली . विविध धर्म हे निर्माण झाले. त्यामध्ये मुख्य धर्म हिंदू,मुस्लिम,ख्रिस्ती,शीख ,बुद्धिस्ट,जैन,या प्रमुख धर्मा शिवाय पारशी आणि अन्य अनेक लहान मोठे धार्मिक समुदाय आहेत. या धर्माचे संस्थापक यांना देव समजणारे अनुयायी यांना देव मानतात तर थोडक्यात “ देव म्हणजे ज्याच्या जवळ कोणत्याही गोष्टीची कमी नसणे. सर्व काही करता येण्याची सर्व अडचणीवर उपाय ज्यांच्याकडे असतात. असा व्यक्ति म्हणजे देव होय.” हिंदू धर्मातील देव – राम,कृष्णा,हनुमान. मुस्लिम- मो.पेगबर,अल्लाह.ख्रिस्ती- येशू. शीख- वाहेगुरू , बुद्धिस्ट – तथागत भगवान बुद्ध , जैन- वर्धमान महावीर. हे सर्वच्या सर्व देव लोकांचा विचार केला असता.हे सर्व देव लोक राजाची मुले होती.प्राचीन काळात योग शिकणे हे फक्त राजा च्या कुटुंबालाच समत्ती होती.किवा संन्यासी लोक हि विद्या शिकत असत.बाकी समाजातील लोक या विद्ये बद्दल जास्तीची माहिती नव्हती. तर यांना जी योगा विषई जी माहिती बालपणी मिळाली त्याचा अभ्यास त्यांनी जीवनभर केला व जे त्यांचे शिष्य होतील त्याना पण प्रशिक्षित केले.यांचे जास्तीत जास्त जीवन हे निसर्गाच्या सानिध्यात गेलेले आहे. यांचा कोणत्याही धर्मग्रंथाचा अभ्यास केला असता.एकाही धर्मग्रंथा मध्ये या देवांना साधी सर्दी झाल्या चा सुद्धा उल्लेख नाही. याचे कारण यांना पंचमहाभूता चा चांगला अभ्यास होता.जसे की,शरीर हे पाच घटका पासून तयार झालेले आहे.१)पाणी २)पृथ्वी ३)आकाश ४)वायु ५)अग्नि या तत्वांचे शरीरात असंतुलन निर्माण झाले. की आजार तयार होतात.यांना संतुलन कसे करायचे ? यांचे ज्ञान या सर्व देवा कडे होते. आज आपण या पाचही घटकाचा अभ्यास प्राकृतिक चिकित्सा या विषया मध्ये करतो. त्या सर्व पद्धती आज योग साधक हे चिकित्सा करताना वापरतात. ह्या सर्व धर्मातील कोणत्याही देवाचे व्यक्तीमत्व पहिले असता. एकाही देवाच्या पोटा चा आकार वाढलेला नाही.यांचे शरीरपिळदार,अकर्षक वेशभूषा आहे. सर्व च्या सर्व जन हे महर्षि पतंजलि यांनी सांगितलेल्या अस्टांग योगचा अभ्यास करतात.याचे विचार जर वाचले तर महर्षी पतंजलीनि सांगितलेल्या सर्वच्यासर्व गोष्टीचे( यम,नियम,आसन,प्राणायाम,धारणा,ध्यान,स माधी) पालन करतात.

या सर्व धर्म चे तत्त्वज्ञान हे सारखेच आहे.यावरून योगा व सर्व धर्मातील देव यांना योगा ची माहित्ती हि होती.हे आपण म्हणूशकतो.

मानसशास्त्र चे अभ्यासक – वर उल्लेख केलेले सर्व देव लोक यांना अजच्या मानसशास्त्राचा खूप चांगला अभ्यास केलेला होता.ते चांगले या विषया मध्ये पारंगत होते. जेस की, श्रीकृष्ण यांनी गीते मध्ये जो काही अर्जुन यांना उपदेश केला आहे. तो उपदेश हा शुद्ध समुपदेशन चा भाग आहे. जो अजसुद्धा अभ्यासा करिता वापरात आणला जातो. ती उदाहरणे आज पण लागू पडतात.

तथागत बुद्ध यांनी समुपदेशन केल्या चे किती तरी उदा. देता येतील. जसे की डाकू अंगुलीमाला यांना त्यांनी समुपदेशन करून बुद्ध भीककक्ष बनविले. राजा मिलिंद व भन्ते नगसेन यांचा संवाद हा समुपदेशनच आहे हे मिलिंद प्रश्न या ग्रंथा मध्ये सांगितले ले आहे.हा संवाद पूर्ण सहा महीने पर्यन्त चालला होता. यांनी लोक च्या ज्या समस्या सोडविल्या तर त्य आज पण आदर्श मणून घेतल्या जातात. त्यांची दूरदृष्टि खूप दूरवर होती.

हस्तमुद्रा मध्ये देवलोक- प्रत्येक् देव हा हस्त मुद्रे मध्ये दिसून येतो याचे कारण म्हनजे मानवी शरीर पंचमहाभूत पासून बनलेले आहे. तर हे घटक कमी किवा जास्त झाले तर शरीरात आजार तयार होतात . यांना संतुलित केले तर शरीर निरोगी होते.

भगवान महावीर,तथागत बुद्ध हे नेहमी पद्मासना मध्ये बसलेले दिसून येतात पण याचे कारण या आसनात बसल्याने शरीरातील सर्व आजार नाहीसे होतात.

हस्तमुद्रा- मानवी शरीर च्या बोटामध्ये पंचमहाभूत आहेत व या बोटा च्या मदतीने आपण कोणते ही तत्व कमी किवा जास्त करू शकतो. सोबतच जे आजार आहेत ते पण निघायला मदत होते. तर एक एक तत्व व ते तत्वा चे लोक कसे असतात.?याची माहिती खालील प्रमाणे पाहू .

पृथ्वी तत्व – हे तत्वचे गुण भारी,ठोस,स्थूल असे असते . भोतीक शरीर ची निर्मिती या तत्व ने झाली आहे. हे तत्व शरीरात १२% आहे. या मध्ये येणारे घटक हे हाडे,केस,त्वचा हे पृथ्वी तत्वा पासून बनले आहे.या तत्वा ची विशेष उत्पत्ति ही पायाच्या पंजा पासून तर गुडघ्या पर्यन्त आहे. या मध्ये जास्त पृथ्वी तत्व आहे.

या तत्व ची कमतरता असेल तर व्यक्ती मध्ये ध्येर्य नसते,विचार अस्तिर असतात. कामात टिकून राहत नाहीत,धन ची कमतरता पडते,हाडाच्या समस्या उद्भवतात,केस गळती होते,त्वचा निस्तेज पडते.शरीर जाड होते. भीती वाटणे ,सुरक्षित न वाटणे या सर्व समस्या ह्या पृथ्वी तत्व कमी असल्या ने निर्माण होतात.

उपाय – आज आधुनिक युगात मानवा चा संबंध हा मातीशी कमी होत चालला आहे. पूर्ण दिवस भर पायात चप्पल ,बूट असतात व घरी जरी आपण विना चप्पल ,बूट फिरलो तरी दगडी फरची सोबत संपर्क येतो म्हणजे आपला माती सोबत संबध येणे बंद झाले आहे. तर आपला माती सोबत संबध वाढला पाहिजे. एका आठवडा मध्ये चिखल आंघोळ करणे,जमिनी वर बसने,मडक्या तिल पाणी पिणे.सोबत च पृथ्वी मुद्रा च्या अभ्यास लाभ देतो. ही मुद्रा करंगळी जवळील बोट एकमेका ला स्पर्श करून पृथ्वी तत्व वाढण्या करिता मदत होते.

२ जलतत्व- मानवी शरीर हे ७५%पाण्या चे बणलेल आहे या मूळे मानवी देहा ला पाण्या ची खूप गरज आहे . पाणी हे शरीराला थंड करण्या चे काम करते.शरीरातील तरलिय पदार्थ जसे रक्त,वीर्य,मूत्र,चरबी,लाळ या घटकाणा जल संचालित करते. पाणी शारीराला एक नवीन ऊर्जा प्रदान करते. पाण्याच्या तीन आवस्ता आहेत.

A)बर्फ तरलता (liquid) वायु (gas)

ज्या व्यक्तीमधे पाणी हे तत्व जास्त असते असे लोक खूप चंचल असतात,चिंतनशील असतात,कल्पनाशिल,मिलनसार,चिकाटी,वि चारवान,सामाजिक,बहिर्मुखी,थंड जास्त आवडते,निसर्ग ठिकाण जास्त आवडतात जसे सरोवर ,नदी,किनारे. असे लोक कला,लेखन,भावनिक असतात,कठोर नसतात,स्वत ला ॲडजस्ट करतात. तर ज्याचा मध्ये पाणी तत्व ची कमतरता असते असे लोक या च्या उलट असतात,सोबत पचन समस्या येतात,शरीर कमजोर होते,लेगिक समस्या येतात.

उपाय – वरुण मुद्रा केल्यास वरील आलेल्या सर्व समस्या कमी होतात. तर वरुण मुद्रा ही अंगठा व करंगळी

३ अग्नीतत्व हे तत्व ऊर्जा तयार करते. जेव्हा शरीरात राग ,घाम,ताप,खूप भूक लागणे या वेळी अग्नि तत्व हे शरीरात तयार झालेले असते.

ऊर्जा तत्व ची लक्षणे- ज्या व्यक्ति च्या शरीरात ऊर्जा असते असी व्यक्ति शरीरा ने मजबूत असते,सतत काम करत राहतात. हे व्यक्ति झोपेमधून सकाळी लवकर उठतात. यांचात सहसिपणा खूप असतो.तेजस्वी चेहरा असतो. पटकन निर्णय घेतात. आत्मविश्वास भरपूर असतो.उत्साही असतात. हे लोक गरम स्वभाव चे असतात. जसे (सुबाष चंद्र बोस),आक्रमकता असते. असे लोक लष्कर,पोलिस दल मध्ये नोकरी करतात. ऊर्जा तत्वा चे असंतुलन – चिंता,दु:ख,निराशा,शरीर कमजोरी,हिणभवणा,आळस,थकवा,भूक न लागणे,अपचन,साखर,तहान न लागणे ,नेहमी ताप येणे,हे शारीरिक रोग दिसून येतात.

उपाय- ऊर्जा तत्व वाढण्या करिता व्यायाम करणे,प्राणायाम करणे,भास्त्रीका,सूर्यभेदी आणि कपालभाती प्रानायाम करू शकतो.

मुद्रा-करंगळी जवळील बोट मधून वाकवून त्या ला अंगठा ने दाबणे ही अग्नि मुद्रा तयार होते व शरीरात ऊर्जावाढी करिता ही मुद्रा मदत करते.

४ वायु तत्व- हवे ला जीवनात खूप सारे अनन्य असे महत्व आहे.हवा नसेल तर मानव जीवंत राहू शकत नाही. शरीरात हवेचे प्रमाण ६% आहे. मानवी शरीर ची गती ही हवा या तत्व मुळेच होते. शरीरा मधील हवेचे घटक रक्त प्रवाह ,श्वास घेणे/सोडणे,विचार येणे/ जाणे, विचार खूप जास्त /कमी येणे हे सर्व वायु तत्व मुळेच होते. या तत्वाचे स्थान शरीरात नाभी ते रद्य पर्यन्त आहे.

लक्षणे – हे लोक खूप बोलतात,फील्ड मधील कामे जास्त करणे,मोकळे राहायला आवडते,दबावात काम न् करणे,गती ने चालणे,नाव प्रसिद्धी मिळते,हे सर्व गुण हवा या तत्व मध्ये असतात. तर हवा तत्व चे असंतुलन असेल तर मात्र असामाजिक असणे,लाजाळू ,अंतर्मुखी,हिणभवणा,संवाद चांगला नसणे हे घटक वायु कमी असल्या मूळे होतात.

उपाय – हवा तत्व नीट करण्या साठी योगाभ्यास पवणमुक्तासण करणे या मूळे शरीर मधील अटकलेली हवा बाहेर निघायला मदत होते. अनुलोम विलोम प्राणायाम केल्याने फायदा होतो..निसर्गा च्या सानिध्यात राहणे,ध्यान करणे(विपस्सना). मुद्रा-अंगठा जवळील बोटाच्या टोका वर स्पर्श करणे याने ध्यानमुद्रा लागून वरील हवा तत्व चे सर्व आजार निघून जायला मदत होते.

५ आकाश तत्व- शरीरात रिकामी जागा जिथे असते तिथे आकाश तत्व असते असे आपण मनू शकतो. उदा. नाड्या,नसाया मधून जो रक्त प्रवाह होतो. या मध्ये जे खालीपण असते ते आकाश तत्व होय. या तत्व ची शरीरात जागा ही डोक्यापासून तर गळ्या पर्यन्त असते. लक्षणे- राग ,लज्जा,भीती,मोह,द्वेष,ध्वनि,विचार हे जास्त येतात. तर असंतुलन झाले तर मात्र पचन समस्या,वात रोग,जाइंट मध्ये तकलिब,बोलताना त्रास होणे,बहिरेपणा येणे,गळ्या च्या समस्या येतात,मानसिक अशांती,चिंता,अति विचार येणे हे सर्व आजार आकाश तत्व कमी असल्या चे लक्षणे आहेत.

उपाय- आकाश तत्व हे चांगले करण्या साठी उपवास करणे,मोकळ्या जागेत जाणे वेळ घालवने,एकांतात वेळ घालवने. आकाश मुद्रा ही हाताचे सर्वात उंच बोट हे अंगठा ला स्पर्श करून आकाश मुद्रा लावली असता. जे आजार झाले तर ते या मुद्रे मूळे दूर होतात.

निष्कर्ष- ह्या सर्व हस्तमुद्रा आज सुद्धा काम करतात व त्याचे फायदे आपणाला होऊन मानवी जीवन हे चांगले व्हायला मदत होते.

**प्रमोद पडघन**
लेखक- मानसशास्त्र समुपदेशक व योगउपचार मध्ये कार्यरत आहेत.
मो. ९०७५९७७२३९

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002